अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक १

श्रीगणेशाय नमः। श्रीसरस्वत्यै नमः। श्रीगुरुभ्यो नमः

श्रीगुरु म्हणती दंपतीसी। ऐका तो पराशर ऋषि।

तया काश्मीर रायासी। रुद्राक्षमहिमा निरोपी॥ १ ॥

गद्यरुप :- मी श्रीगणेशाला नमस्कार करतो. मी श्रीसरस्वतीला नमस्कार करतो. मी श्रीगुरुंना नमस्कार करतो.

श्रीगुरु (त्या) नवराबायकोस (अध्याय ३३ मधील दत्त व त्याची पत्नी) ह्या जोडप्यास म्हणाले, “त्या पराशर ऋषींनी काश्मीरच्या राजाला रुद्राक्ष महिमाचा दिलेला संदेश ऐका.”

शब्दार्थ :-

दंपती = नवराबायको	राया = राजा
निरोप = संदेश	महिमा = थोरवी

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक २

तया राजकुमाराचें। पूर्वजन्मींचें चरित्र साचें।
विस्तार करोनि सुधावाचें। निरोपिलें ऋषीश्वरें॥ २॥

गद्यरुप :- त्या राजकुमाराचे पूर्वजन्मीच्या चरित्राचा भगवान असलेल्या ऋषीने (पराशर ऋषींनी) आपल्या अमृत वाणीने बऱ्यापैकी विस्तारुन संदेश दिला.

शब्दार्थ :-

साचे = खरे, बरे	सुधा = अमृत

वाणी = वाचा	निरोप = संदेश	ईश्वर = भगवान

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ३

संतोषोनि तो राजा। लागला त्याचे पादांबुजा।
कर जोडोनियां वोजा। विनवीतसे परियेसा॥ ३ ॥

गद्यरुप :- समाधानी झालेल्या त्या राजाने त्याचे (पराशर ऋषींचे) चरणकमळ धरले (राजाने ऋषींच्या पायांना हात लावला). (नंतर) चांगल्यारीतीने (व्यवस्थित) हात जोडून (राजाने ऋषीला) विनविले, ते ऐका.

शब्दार्थ :-

संतोष = समाधान	पादांबुजा = पाद् (पाय) + अंबुजा (कमळ)
कर = हात	वोजा = चांगल्या रीतीने
परियसणे = ऐकणे	

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ४

राजा म्हणे ऋषीश्वरासी। स्वामी निरोपिलें आम्हांसी।
पुण्य घडलें आत्मजासी। रुद्राक्षधारण करोनियां॥ ४॥

गद्यरुप :- राजा, भगवान असलेल्या (पराशर) ऋषीला म्हणाला, "स्वामी, माझ्या मुलाने पूर्वजन्मात अज्ञानाने रुद्राक्ष धारण केल्याने, त्याला पुण्य घडले. हा संदेश तुम्ही आम्हाला दिलात."

शब्दार्थ :-

ईश्वर = भगवान	निरोप = संदेश	आत्मज = पुत्र = मुलगा

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ५

पूर्वजन्मीं अज्ञानेसीं। रुद्राक्ष बांधिले तये वेश्यीं।
तेणें पुण्यें दशा ऐशी। पावले दोघे कुमारक॥५॥

गद्यरुप :- पूर्वजन्मी (मागील जन्मात)त्या वेश्येने (तिच्याकडील माकड व कोंबडा ह्यांना) रुद्राक्ष बांधले. त्या दोघांनी (माकड व कोंबडा ह्यांनी) अज्ञानाने (अजाणतेपणाने) रुद्राक्ष धारण केले, त्यामुळे त्यांना अशी पुण्य अवस्था (स्थिती) मिळून ते (दोघे राज घराण्यात) कुमार (मुलगे) म्हणून जन्माला आले.

शब्दार्थ :-

दशा = अवस्था, स्थिती

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ६

ज्ञानवंत ते आतां जाण। रुद्राक्ष करिताति धारण।
पुढें यांचें लक्षण। कवणेपरी वर्ततील॥ ६ ॥

गद्यरुप :- "ते (दोघे कुमार) आता ज्ञानवंत झाले असून, त्यांना रुद्राक्ष धारण करण्याची जाण आहे. पुढे (पुढील आयुष्यात) ह्यांचे जीवनात शुभ-अशुभ कशा प्रकारचे असतील ?"

शब्दार्थ :-

धारण = अंगावर घेणे	वर्तणे = असणे, घडणे
कवण-कवणा = कोण ?,कोणता ?,काय ?	
लक्षणं (संस्कृत) =ज्योतिष शास्त्रातील शुभाशुभ चिन्ह	

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ७

भूत - भविष्य - वर्तमानीं। त्रिकाळज्ञ तुम्ही ज्ञानी।
सांगा स्वामी विस्तारूनि। माझे - मंत्रिकुमरकाचें॥७॥

गद्यरुप :- तुम्ही भूतकाळ, वर्तमान काळ आणि भविष्य काळ अशा तिन्ही काळांचे ज्ञानी आहात. स्वामी, तुम्ही माझ्या व माझ्या मंत्र्याच्या बाळांचे (मुलांचे) भविष्य विस्तारून सांगा.

शब्दार्थ :-

भूत = झालेले मागचे	भविष्य = पुढे येणारा काळ
वर्तमान = सध्याचे, चालू	कुमर = बाळ
त्रिकाळज्ञ = त्रि (३) + काळ (भूत, भविष्य, वर्तमान) + ज्ञ (जाणकार)	

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ८

ऐकोनि रायाचें वचन। सांगे ऋषि विस्तारून।
दोघां कुमरकांचें लक्षण । अपूर्व असे परियेसा॥८॥

गद्यरुप :- राजाचे बोलणे ऐकून (पराशर) ऋषीने सांगितलेले, दोन्ही बालकांच्या भावी जीवनातील शुभ अशुभ अपूर्व असे होते, हे ऐका.

शब्दार्थ :-

राया = राजा	कुमर = बाळ
लक्षणं (संस्कृत) =ज्योतिष शास्त्रातील शुभाशुभ चिन्ह	
अपूर्व = नवल	परियसणे = ऐकणे

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ९

ऋषि म्हणे रायासी। पुत्राचें होणार पुससी।
ऐकतां दुःख पावसी। कवणेपरी सांगावें॥ ९॥

गद्यरुप :- ऋषी राजाला म्हणाले, "पुत्राच्या भावी आयुष्यात घडणारे भविष्य तू विचारत आहेस. हे भविष्य ऐकल्यावर तुला दुःख मिळणार आहे (तु दुःखी होणार आहेस), त्यामुळे हे भविष्य कोणत्या प्रकारे तुला सांगावे ?"

शब्दार्थ :-

राया = राजा	पुसणे = विचारणे	पावणे = मिळणे
कवण कवण-कवणा = कोण ?, कोणता ?, काय ?		
परी = प्रमाणे		

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक १०

राजा विनवी तयेवेळीं। स्वामी निरोपावें सकळी।
उपाव करोनि तात्काळीं। दुःखावेगळा तुंचि करिसी॥ १०॥

गद्यरुप :- त्यावेळी राजा (पराशर) ऋषींना विनवू लागला, “स्वामी, तुम्ही सगळ्या भविष्याचा संदेश द्यावा (सर्व भविष्य कथन करावे). त्यावर तात्काळ लगेच इलाज करुन, तूच मला दुःख वेगळा करणार आहेस.”

शब्दार्थ :-

निरोप = संदेश
सकळ = सर्व, संपूर्ण, अवघे
उपाव = इलाज, युक्ती

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ११

ऐसें म्हणतां ऋषेश्वर।सांगता जाहला विस्तार।
ऐक राया तुझ्या कुमरा। वर्षें बारा आयुष्य असे॥ ११ ॥

गद्यरुप :- असे (राजाने) म्हणताच, त्या ऋषेश्वराने (पराशर ऋषीने) भविष्य विस्तारुन (सविस्तर) सांगितले. (पराशर ऋषी म्हणाले), "राजा ऐक. तुझ्या बालकाचे आयुष्य १२ वर्षे आहे."

शब्दार्थ :-

ऋषेश्वर= ऋषी + ईश्वर (भगवान)	राया = राजा	कुमर = बाळ

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक १२

तया बारा वर्षांत। राहिले असती दिवस सात।
आठवे दिवशीं येईल मृत्यु। तुझ्या पुत्रासी परियेसा॥ १२॥

गद्यरुप :- "त्या बारा वर्षांतील सात दिवस राहिले आहेत. आठव्या दिवशी तुझ्या मुलाला न्यायला मृत्यु येईल." हे ऐका.

शब्दार्थ :-

परियसणे = ऐकणे

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक १३

ऐकोनि ऋषीचें वचन। राजा मूर्च्छित जाहला तत्क्षण।
करिता जाहला रोदन। अनेकपरी दुःखित॥ १३ ॥

गद्यरुप :- (पराशर) ऋषीचे बोलणे ऐकून, त्या क्षणी राजा मूर्च्छित झाला. अनेक प्रकारे दुःख व्यक्त करीत, राजा रडायला लागला.

शब्दार्थ :-

वचन = बोलणे	मूर्च्छा = चक्कर, घेरी
रोदन = रडणे, आक्रोश	परी = प्रमाणे

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक १४

ऐकता राजा तये वेळीं। लागला ऋषीचे चरणकमळीं।
राखें राखें तपोबळी। शरणागत मी तुझा॥ १४॥

गद्यरुप :- (पराशर) ऋषीचे बोलणे ऐकताच, त्यावेळी राजाने ऋषीचे पाय धरले. मी तुला शरण आलेलो असून; हे तपस्वी, मला राख (वाचव).”

शब्दार्थ :-

चरण = पाय	तप = तपश्चर्या	बळ = बल = शक्ती
शरणागत = शरण + आगत (आलेला)		

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक १५

नानापरी गहिंवरत। मुनिवराचे चरण धरीत।
विनवीतसे स्त्रियेसहित। काय करावें म्हणोनि॥ १५॥

गद्यरुप :- नाना प्रकारे गहिवरत, (राजाने) मुनिवराचे (पराशर ऋषीचे) पाय धरले. आम्ही काय करावे ? म्हणून पत्नीसह राजाने (ऋषीला) विनविले.

शब्दार्थ :-

परी = प्रमाणे	वर = श्रेष्ठ
चरण = पाय	सहित = बरोबर, सह
स्त्री = बायको	

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक १६

कृपानिधि पराशर। सांगता झाला विस्तार।
शरण रिघें जगद्गुरु। उमाकांत शिवासी॥ १६ ॥

गद्यरुप :- कृपेचा ठेवा असलेला पराशर ऋषीने, विस्तारुन (सविस्तर उपाय) सांगितला, "उमेचा पती असलेल्या जगद्‌गुरु शिवाला शरण जावे."

शब्दार्थ :-

निधि = ठेवा	खजिना = खाण	रिघणे = शिरणे प्रवेशणे
जगद्गुरु = जगत् + गुरु = जगाचा गुरु		
उमाकांत = उमा + कांत (नवरा) = उमेचा नवरा		

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक १७

मनींचें भय त्यजूनि। असावें आतां शिवध्यानीं।
तो राखेल शूलपाणि। आराधावें तयासी॥ १७॥

गद्यरुप :- “मनातील भिती सोडून देऊन, आता शिवाचे ध्यान करावे. तो शंकर तुम्हाला राखेल (वाचवेल). त्याची आराधना करावी.”

शब्दार्थ :-

भय = भिती	त्यजणे = सोडणे	ध्यान = एकाग्र चिंतन
शूलपाणि = शंकर, महादेव	आराधना = प्रार्थना	

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक १८

जिंकावया काळासी। उपाव असे परियेसीं।
सांगेन तुम्हां विस्तारेसीं ।एकचित्तें अवधारा॥ १८॥

गद्यरुप :- "काळाला जिंकण्याचा एक ऐकलेला इलाज आहे; तो मी तुम्हाला विस्ताराने सविस्तर सांगेन, तुम्ही एकचित्ताने ऐका."

शब्दार्थ :-

उपाव = इच्छा, इलाज	परियसणे = ऐकणे	अवधारणे = ऐकणे

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक १९

स्वर्ग-मृत्यु-पाताळासी। देव एक व्योमकेशी।
निःकलंक परियेसीं। चिदानंदस्वरुप देखा॥ १९॥

गद्यरुप :- स्वर्ग,मृत्यु,पाताळ ह्या तिन्ही लोकांचा शंकर हा एक देव असून, तो कलंक नसलेला आहे; हे ऐक. त्याचे चिदानंदस्वरुप पहा.

शब्दार्थ :-

व्योमकेश = शंकर	निःकलंक = कलंक नसलेला
परियसणे = ऐकणे	मृत्युलोकः (संस्कृत) = पृथ्वी
चिदानंदस्वरुप = चित् (चैतन्य) + आनंद + स्वरुप = शुद्ध चेतना	

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक २०

ऐसा देव मूर्तिमंत। रजोरूपें ब्रह्मा सृजित।

सृष्टीक्रमण कारणार्थ। वेद चारी निर्मिले॥२०॥

गद्यरुप :- असा हा देव मूर्तिमंत असून, त्याने रजोगुणरुपी ब्रह्मदेव निर्माण करुन, सृष्टीची व्यवस्था लावण्याप्रित्यर्थ (कारणासाठी) चारही वेदांची निर्मिती केली.

शब्दार्थ :-

सृजणे = निर्माण करणे	क्रम = व्यवस्था

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक २१

तया चतुर्वेदांसी। दिधलें तया विरंचीसी।
आत्मतत्त्व संग्रहासी। ठेंविलें होतें उपनिषद॥ २१ ॥

गद्यरुप :- ते चारही वेद त्याने विरंची (सृष्टी निर्मिती करणारा प्रथम कल्पाचा ब्रह्मदेव) ला दिले. (शंकराने) आत्मतत्व संग्रहाचे (संग्रहित करणारे) उपनिषद ब्रह्मदेवाकडे ठेवले होते.

शब्दार्थ :-

चतुर्वेद = चतुः(संस्कृत) (चार) + वेद = ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद	
दिधणे = देणे	विरंची = ब्रह्मदेव
उपनिषद् (संस्कृत) = वेदान्तविषयक ग्रंथ	

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक २२

भक्तवत्सल सर्वेश्वर*। त्याही दिधला वेदसार।
रुद्राध्याय विस्तार। दिधला तया ब्रह्मयासी॥ २२ ॥

गद्यरुप :- भक्तवत्सल असलेल्या सर्वेश्वरालाही, वेदसार (वेदांचे सार) दिले. त्या ब्रह्मदेवाला 'रुद्राध्याय' विस्तार दिला.

शब्दार्थ :-

वत्सल = मायाळू, ममताळू
सर्वेश्वर = परमेश्वर, विष्णु,महादेव

भक्तवत्सल सर्वेश्वर* म्हणजे 'विष्णु' असावे.

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक २३

रुद्राध्यायाचा महिमा । सांगतां असे अगम्या।
यातें नाश नाहीं प्राणा । अव्यय असे परियेसा॥ २३ ॥

गद्यरुप :- रुद्राध्यायाचा महिमा सांगितला तर समजण्यास कठीण आहे. रुद्राध्यायाचा प्राणासारखा जीवासारखा नाश होत नष्ट होत नाही. रुद्राध्याय शाश्वत आहे, हे ऐका.

शब्दार्थ :-

महिमा = थोरवी	अगम्य = दुर्बोध = समजण्यास कठीण
अव्यय = शाश्वत	परियसणे = ऐकणे

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक २४

परतत्त्व शिवात्मक। रुद्राध्याय असे अधिक।
ब्रह्मयानें चतुर्मुख। विश्व सृजिलें वेदमतें॥ २४॥

गद्यरुप :- परमात्मा तत्व हे शिवात्मक असल्याने, 'रुद्राध्याय' श्रेष्ठ आहे. चार मुखे असलेल्या ब्रह्मदेवाने, वेदमतांनुसार (वेदात सांगितल्यानुसार) विश्व निर्माण केले.

शब्दार्थ :-

पर = परमात्मा	अधिक = श्रेष्ठ
चतुर्मुख = चतुः (संस्कृत) चार + मुख (तोंड)	
सृजणे = निर्माण करणे	

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक २५

तया चतुर्मुखीं देखा। वेद चारी सांगे निका।
वदनी दक्षिण ऐका। यजुर्वेद निरूपिला॥ २५॥

गद्यरुप :- त्याच्या चारही मुखांनी, चारही वेद सांगताना, तो (ब्रह्मदेव) स्पष्ट दिसत होता. त्याच्या दक्षिण दिशेकडील तोंडाने यजुर्वेदाचा संदेश दिला (सांगितला), हे ऐका.

शब्दार्थ :-

चतुर्मुख = चतुः (संस्कृत) चार + मुख (तोंड)	
निका = स्पष्ट	वदन = तोंड

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक २६

तया यजुर्वेदांत। उपनिषदसार ख्यात।
रुद्राध्याय विस्तारत। सांगे ब्रह्मा मुनिवरां॥ २६ ॥

गद्यरुप :- त्या यजुर्वेदांत उपनिषदाचे सार प्रसिद्ध आहे. उपनिषदाचे सार असलेला रुद्राध्याय ब्रह्मदेवाने मुनिवरांना विस्तारत (सविस्तर) सांगितला.

शब्दार्थ :-

ख्यात = प्रसिद्ध	वर = श्रेष्ठ

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक २७

समस्त देव - ऋषींसी । मरीचि अत्रि परियेसीं।
आणिक समस्त देवांसी। सांगे ब्रह्मा तये वेळी॥ २७॥

गद्यरुप :- (ब्रह्मदेव रुद्राध्याय सांगत असताना) मरिची, अत्रि अशा सर्व देवऋषी ह्यांनी रुद्राध्याय ऐकला. आणखीन सर्व देवांना, त्यावेळी ब्रह्मदेवाने रुद्राध्याय सांगितला.

शब्दार्थ :-

समस्त = सर्व
देव = ब्राह्मणाच्या नांवांतील उत्तरपद ज्ञान
परियेसणे = ऐकणे

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक २८

तेंचि ऋषि पुढें देखा। शिकविती आपुले शिष्यादिकां।
त्यांचे शिष्य पुढें ऐका। आपुले शिष्यांसी शिकविलें॥ २८॥

गद्यरुप :- त्याच ऋषींनी पुढे आपल्या शिष्य वगैरेंना शिकविलेले दिसते.
त्यांच्या शिष्यांनी आपल्या शिष्यांना शिकविले, हे ऐका.

शब्दार्थ :-

शिष्यादिका = शिष्य + आदिका (इतर, वगैरे)

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक २९

पुढें त्यांचे पुत्रपौत्रीं। शिकविलें ऐका पवित्रीं।
विस्तार झाला जगत्त्रीं। रुद्राध्याय भूमीवरी॥ २९॥

गद्यरुप :- पुढे त्यांनी पवित्र असा रुद्राध्याय आपल्या मुल-नातवंडांना शिकविला, हे ऐका. तिन्ही जगातील स्वर्ग पृथ्वी आणि पाताळ ह्यांच्यातील भूमीवर पृथ्वीवर रुद्राध्यायचा विस्तार झाला {पृथ्वीवरील(भूमीवरील) मनुष्याने आपल्या पुढील पिढ्यांना(मुल-नातवडांना) रुद्राध्याय शिकविल्याने, फक्त भूमीवर (पृथ्वीवर) त्याचा रुद्राध्यायचा विस्तार प्रसार झाला.

शब्दार्थ :-

पुत्र = मुलगा	पौत्र = मुलाचा मुलगा = नातू
जगत्त्री = जगत् + त्री (३) = तिन्ही जग [स्वर्ग, पृथ्वी, पाताळ]	

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ३०

याहूनि नाहीं आणिक मंत्र। त्वरित तप साधत।
चतुर्विध पुरुषार्थ। लाधे त्वरित परियेसा॥३०॥

गद्यरुप :- रुद्राध्याय शिवाय आणखीन दुसरा मंत्र नाही, ज्याने (ज्या मंत्राने) रुद्राध्याय सारखे तपसाधना त्वरीत करुन; धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चारही पुरुषार्थ त्वरित (लगेच) मिळतात, हे ऐका.

शब्दार्थ :-

साधणे = कार्य सिद्धीस नेणे	
चतुर्विध पुरुषार्थ = चतुः (४) + विध (प्रकार) = धर्म, अर्थ, काम, मोक्ष पुरुषार्थ	
लाधणे = मिळणे	परियसणे = ऐकणे

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ३१

नानापरीचें पातक। केला असेल महादोष।
रुद्रजाप्यें होय निक। तोंचि पावे परम पद॥ ३१ ॥

गद्यरुप :- विविध प्रकारचे पाप केले असले, त्या पापाने महादोष झाला असेल; तरी रुद्र जपाने ती व्यक्ती पवित्र होते. तोच (रुद्र जप करणाराच) फक्त परम पदाला पोहोचतो.

शब्दार्थ :-

नाना = विविध	परी = प्रकार	पातक = पाप
जाप्यक = जप करणारा	निका = पवित्र	
पावणे = पोचणे, मिळणे		

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ३२

आणिक एक नवल केलें। ब्रह्मदेवें रचियेलें।
देवतीर्थ असे भलें। स्नान पान करावें॥ ३२ ॥

गद्यरूप :- ब्रह्मदेवाने आणखीन एक नवल केले. त्याने रचलेले देवतीर्थ भले असून, तिथे स्नान आंघोळ करावी तसेच हे तीर्थ प्यावे.

शब्दार्थ :-

पान = पिणे

देवतीर्थ = रुद्रतीर्थ

ओवी क्रमांक १९ नुसार, स्वर्ग-मृत्यु-पाताळासी। देव एक व्योमकेशी। त्रैलोक्यात (स्वर्ग-पृथ्वी- पाताळात) एकच देव व्योमकेशी (शंकर) आहे. ११ रुद्रांपैकी शंकर हा एक रुद्र आहे.

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ३३

तेणें कर्में परिहरती। संसार होय निष्कृती।
जे जे श्रीगुरुसी भजती। तेंचि तरती भवसागर॥ ३३ ॥

गद्यरुप :- त्याने (रुद्रदेवतीर्थात) स्नान,पान केल्याने, पूर्वी केलेल्या कर्मांचा त्याग होतो; संसार म्हणजे ह्या पूर्वकर्मांचे प्रायश्चित आहे. जे श्रीगुरुंना भजतात, तेच हा संसार सागर तरुन जातात.

शब्दार्थ :-

परिहरणं (संस्कृत) = त्याग	निष्कृति = प्रायश्चित्त
कर्मन् (संकृत) = पूर्वकर्म	भव = संसार

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ३४

सुकृत अथवा दुष्कृत। जें जें कीजे आपुलें हित।
जैसे पेरिले असेल शेत। तेंचि उद्भवे परियेसा॥ ३४॥

गद्यरुप :-

चांगले काम अथवा वाईट काम ह्या दोन्ही कर्मांमधून आपल्या हिताचे कर्म काय आहे ? जसे शेत पेराल तसेच उत्पन्न होते, हे ऐका.

शब्दार्थ :-

सुकृत = सु (चांगले) + कृत (कृत्य, काम)	
दुष्कृत = दुः (वाईट) + कृत (कृत्य, काम)	
की = काय ?	हित = उपयुक्त
उद्भवणे = उत्पन्न होणे	परियसणे = ऐकणे

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ३५

सृष्टिधर्म प्रवृत्तीसी। रचिलें -ब्रह्मयानें परियेसी।
आपुले वक्षपृष्ठदेशीं। धर्माधर्म उपजविले॥ ३५॥

गद्यरुप :- सृष्टी धर्माच्या गतीची रचना ब्रह्मदेवाने केली, असे ऐकिवात आहे. ब्रह्मदेवाने आपल्या (स्वतःच्या) छातीपासून धर्म आणि पाठीपासून अधर्म उत्पन्न केले.

शब्दार्थ :-

प्रवृत्ती = गती	परियसणे = ऐकणे	वक्ष = छाती
पृष्ठ = पाठ	देशः (संस्कृत) = जागा	
धर्माधर्म = धर्म + अधर्म	उपजणे = उद्भवणे = उत्पन्न होणे	

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ३६

जे जन धर्म करिती। इह सौख्य होय गति।
अधर्मे जे रहाटती। पापरूपि तेचि जाणा॥ ३६ ॥

गद्यरुप :- जे लोक धर्माचे आचरण करतात, त्यांना या जगांत (पृथ्वीवर) सुख मिळून सद्गती प्राप्त होते; अधर्म अंगवळणी पडल्यासारखे ज्यांचे आचरण असते, ते पापरुपी असतात; हे जाणा.

शब्दार्थ :-

जन = लोक	इह (संस्कृत) = येथे, या जगांत
सौख्यं (संस्कृत) = सुख	रहाटणे = अंगवळणी पडणे

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ३७

काम क्रोध लोभ खूण। मदमत्सर परिपूर्ण।
‘अधर्माचे सुत’ जाण।इतुके नरकनायक॥ ३७॥

गद्यरुप :- काम, क्रोध, लोभ ह्या खुणा (स्वभाव विशेष) असलेले, तसेच उन्मतपणा आणि मत्सर (दुसऱ्याचा द्वेष) ह्यांनी परिपूर्ण असलेले लोक, अधर्माची मुल आहेत; हे जाणा. हे सर्वजण नरकाचे नायक आहेत. (पृथ्वीवर नरक निर्माण करणारे आहेत).

शब्दार्थ :-

कामः (संस्कृत) = विषयेच्छा		क्रोध = राग, संताप
मद = उन्मत्तपणा	मत्सर = द्वेष, हेवा	परिपूर्ण = भरलेले, तृप्त
सुत = मुलगा	नरक = यमलोकींची यातनाप्रद जागा	
लोभ = हातचे जाऊ नये ही इच्छा		

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ३८

गुरुतल्पग सुरापानी। पुल्कसस्वरूप अंतःकरणीं।
कामुक असती परिपूर्णी। तेचि प्रधान नरकीचे॥ ३८॥

गद्यरुप :- गुरुच्या बिछान्यात जाणारे (गुरु पत्नीशी गमन करणारे), दारु पिणारे; निर्दय, पापी, दुष्ट स्वरुपाचे अंतःकरण असलेले लोक परिपूर्ण विषयासक्त असून, हेच लोक नरकातील प्रधान असतात.

शब्दार्थ :-

तल्प = बिछाना	ग = जाणारा
सुरा =मद्य दारु	पान = पिणे
पुल्कसः (संस्कृत) = चांडाळ = चंडाळ = शुद्र व ब्राह्मण स्त्री यांच्यापासून झालेली संतती, निर्दय, पापी, दुष्ट मनुष्य	
कामुक = विषयासक्त	परिपूर्ण = भरलेले
नरक = यमलोकींची यातनाप्रद जागा	प्रधान = श्रेष्ठ

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ३९

क्रोधें पितृवधी देखा। मातृवधी असती जे कां।
ब्रह्महत्यादि पातका। कन्याविक्रयी जे जन॥ ३९॥

गद्यरुप :- क्रोधामुळे वडिलांची हत्या करणारे लोक जगात दिसतात;
स्वतःच्या आईची हत्या करणारा जर कोणी असल्यास,
ब्राह्मणाची हत्या करणारे इत्यादी पापी लोक, तसेच जे लोक
स्वतःच्या मुलीची विक्री करतात, असे लोक

शब्दार्थ :-

क्रोध = राग, संताप	पितृ (संस्कृत)= पिता = बाप (वडिल)	
मातृ (संस्कृत) = माता = आई	वध = हत्या, ठार मारणे	
ब्रह्म = ब्राह्मण	हत्या = ठार मारणे	पातक = पाप
कन्या = मुलगी	विक्रय = विक्री	

श्रीगुरुचरित्रात कन्येची विक्री करणे म्हणजे त्या कन्येची हत्या करण्यासारखेच आहे, असे म्हटलेले दिसते.

आज २१व्या शतकात कन्या जन्माला येण्यापूर्वी, स्त्री भ्रूण हत्या करणाऱ्या लोकांना ‘क्रोध सुत’ म्हणावे लागेल.

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ४०

इतुके क्रोधापासूनि।उद्भवले म्हणोनि।
पुत्र जहाले जाणोनि। क्रोधसुत म्हणती तयांसी।४०॥

गद्यरुप :- इतके सगळे (पित्याची हत्या, जर कोणी मातेची हत्या केली असेल तर ती हत्या, ब्राह्मणाची हत्या, कन्येची विक्री) क्रोधामुळे उत्पन्न होते (घडते) म्हणून अशा लोकांना 'क्रोधाची मुले' म्हणतात.

शब्दार्थ :-

पितृ = पिता = बाप (वडिल)	माता = आई
वध = हत्या, ठार मारणे	
उद्भवणे = उत्पन्न होणे	सुत = मुलगा

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ४१

द्विज देवस्वहरण देखा । ब्रह्मस्व घेवोनि नेदी जो कां ।
सुवर्णतस्कर ऐका । लोभपुत्र याचें नाम ॥ ४१ ॥

गद्यरुप :- ब्राह्मणाला तसेच देवाला अर्पण केलेल्या वस्तुंचे हरण करणारा, ब्राह्मणाकडून कर्ज घेऊन जो ते कर्ज परत देत नाही (फेडत नाही), तसेच सोन्याची चोरी करणारा (सुवर्ण चोर) अशा लोकांचे नाव 'लोभपुत्र' आहे, हे ऐका.

शब्दार्थ :-

द्विज = ब्राह्मण	देवस्व = देवाला अर्पण केलेली वस्तू इनाम इत्यादी
ब्रह्मस्व = ब्राह्मणाची मालमत्ता, कर्ज	नेदी = देत नाही
सुवर्ण = सोने	तस्कर = चोर
लोभ = लाभाविषयी उत्कट इच्छा	पुत्र = मुलगा

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ४२

ऐशा समस्त पातकांसी । यमें निरूपिलें परियेसीं ।
तुम्हीं जावोनि मृत्यासी । रहाटी करणें आपुल्या गुणें॥ ४२ ॥

गद्यरुप :- अशा सर्व पातकांना यमाने दिलेला संदेश ऐकिवात आहे.
(यमाने ह्या पातकांना सांगितले,) "तुम्ही मृत्युलोकात
(पृथ्वीवर) जाऊन आपल्या गुणांनुसार वागणूक (पापी) करा.

शब्दार्थ :-

पातक = पाप	अधर्म = दोष	निरोप = संदेश
परियसणे = ऐकणे	मृत्युलोकः (संस्कृत) = पृथ्वी	
रहाटी = राहणी = वागणूक		

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ४३

तुम्हांसवें भृत्य देखा । देईन सर्व उपपातकां ।
समस्तां पाठवावें नरका । जे जन असती भूमीवरी॥४३॥

गद्यरुप :- "तुमच्याबरोबर माझे चाकर (यमदूत) दिसतील (येतील). (मी) सर्व उपपातके (छोटी पातके) तुमच्याबरोबर देईन. भूमीवर (पृथ्वीवर) जे जन (लोक) असतील, त्या सर्वांना नरकांत पाठवा."

शब्दार्थ :-

सवे = बरोबर	भृत्य = चाकर
समस्त = सर्व	जन = लोक

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ४४

यमाची आज्ञा घेऊनि। आलीं पातकें मेदिनीं।
रुद्रजाप्यातें देखोनि। पळोनि गेलीं परियेसा॥४४॥

गद्यरुप :- यमाची आज्ञा घेऊन पातके पृथ्वीवर आली. (पृथ्वीवर)
रुद्र जप करणारे पाहून, ही पातके पळून गेली; हे ऐका.

शब्दार्थ :-

मेदिनी = पृथ्वी	परियेसणे = ऐकणे

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ४५

जाऊनियां यमाप्रती। महापातकें विनविती।
गेलों होतों आम्ही क्षिती। भयचकित होऊनि आलों ॥४५॥

गद्यरुप :- यमाकडे जाऊन महापातके विनवीत होती, “आम्ही पृथ्वीवर गेलो होतो. भयचकीत होऊन (परत) आलेलो आहोत.”

शब्दार्थ :-

प्रती = कडे	क्षिती = पृथ्वी

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ४६

जय जय महाराजा । आम्ही पावलों महाभया।
किंकर तुमचे म्हणोनियां । प्रख्यात असे त्रिभुवनीं॥४६॥

गद्यरुप :- “महाराजा (यमराजा) तुमचा जय-जयकार असो. आम्ही तुमचे सेवक म्हणून त्रिभुवनात प्रसिद्ध आहोत. (तरीही) आम्हाला मोठी भीति मिळालेली आहे. (आम्ही घाबरलेलो आहोत.)”

शब्दार्थ :-

पावणे = मिळणे	किंकर = चाकर सेवक	प्रख्यात = प्रसिद्ध

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ४७

आम्ही तुमचे आज्ञाधारी। निरोपें गेलों होतों धरित्रीं।
पोळलों होतों वन्हिपुरीं। रुद्रजाप्यातें देखोनियां॥४७॥

गद्यरुप :- आम्ही तुमचे आज्ञाधारक सेवक असून, तुमच्या संदेशानुसार आम्ही पृथ्वीवर गेलो होतो. तिथे (पृथ्वीवर) रुद्र जप करणाऱ्यांना पाहून, आम्ही अग्नीच्या नगरांत पोळलो.

शब्दार्थ :-

निरोप = संदेश	धरित्री = पृथ्वी
वन्ही = अग्नी	पुरी = नगर

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ४८

क्षितीवरी रहावयासी। शक्ति नाहीं आम्हांसी।
पाहतां रुद्रजाप्यासी। पोळतों आम्ही स्वामिया॥४८॥

गद्यरुप :- "पृथ्वीवर राहण्याची शक्ति आमच्याकडे नाही. हे स्वामी, रुद्र जप करणारा, पाहताच आम्ही पोळले जातो."

शब्दार्थ :-

क्षिती = पृथ्वी

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ४९

ग्रामोग्रामीं नदीतीरीं। वसती द्विज महानगरीं।
देवालयीं पुण्यक्षेत्रीं। रुद्रजाप्य करिताति॥४९॥

गद्यरुप :- “गांवोगांवी, नदीकिनारी, महानगरांत ब्राह्मण लोक राहतात. (हे ब्राह्मण लोक,) पुण्यक्षेत्रांत देवालयांत रुद्र जप करतात.”

शब्दार्थ :-

ग्राम = गाव	वसणे = राहणे	द्विज = ब्राह्मण
देवालय = देव + आलय (घर) = देवाचे घर = देऊळ, मंदीर		

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ५०

कवणेपरी आम्हां गति। जाऊं न शकों आम्ही क्षिती ।
रुद्रजाप्य नर करिती। तया ग्रामीं जाऊं न शकों॥५०॥

गद्यरुप :- आम्ही कोणत्या प्रकारे (पृथ्वीवर) जाणार ? आम्ही पृथ्वीवर जाऊ शकत नाही. रुद्राचा जप मनुष्य (लोक) करतात, त्या गावात आम्ही जाऊ शकत नाही.

शब्दार्थ :-

कवण-कवाणा = कोण ? कोणता ? काय ?	
परी = प्रकार	गति = गमन = जाणे
क्षिती = पृथ्वी	नर = मनुष्य

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ५१

आम्ही जातो नरापाशीं। वर्तवितों पातकांसी।
होतो नर महादोषी। मिती नाहीं परियेसा॥५१॥

गद्यरुप :- आम्ही मनुष्यापाशी (जवळ) जातो. मनुष्याला पातकांनुसार वागायला लावतो. तो मनुष्य महादोषी होतो; ह्या महादोषांची गणना करता येत नाही, हे ऐका.

शब्दार्थ :-

नर = मनुष्य	वर्तणे = वागणे	पातक = पाप
मिति = गणना, प्रमाण	परियसणे = ऐकणे	

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ५२

प्रायश्चित्तसहस्त्रेसीं। जो कां नव्हे पुण्यपुरुषी।
तैसा द्विज परियेसीं। पुण्यवंत होतसे॥५२॥

गद्यरुप :- पुण्यपुरुष (पुण्यवान पुरुष) जो हजारो प्रायश्चितांनी झालेला असतो की नाही, तशाचप्रकारे ब्राह्मण पुण्यवंत होतो, हे ऐक.

शब्दार्थ :-

सहस्त्र = हजार	द्विज = ब्राह्मण

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ५३

एखादे समयीं भक्तीसीं। म्हणतो रुद्राध्यायासी।
तोही पुण्यवंत कैसी। होतो स्वामी यमराया॥५३॥

गद्यरुप :- हे स्वामी यमराया, (असा पुण्यवंत ब्राह्मण) एखादे वेळी रुद्राध्याय भक्तीभावाने म्हणतो,(नेहमी तो ब्राह्मण रुद्राध्याय म्हणत नाही), तरीही तो ब्राह्मण पुण्यवंत कसा होतो ?

शब्दार्थ :-

समय = वेळ

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ५४

तैसा पापी महाघोर। पुण्यवंत होय नर।
भूमीवर कैसे विचरूं। आम्हां कष्ट होतसे॥५४॥

गद्यरुप :- तसा महाघोर पापी असलेला मनुष्य पुण्यवंत होतो, (त्यामुळे) आम्ही भूमीवर (पृथ्वीवर) कसे हिंडू ? आम्हाला पृथ्वीवर हिंडण्यात कष्ट (श्रम) होतात.

शब्दार्थ :-

विचरणे = हिंडणे	नर = मनुष्य	कष्ट = श्रम

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ५५

काळकूट महाविष। रुद्रजाप्य आम्हां दिसे।
शक्ति नव्हे आम्हांसी। भूमीवरी जावया॥५५॥

गद्यरुप :- आम्हाला काळकूट ह्या महाविषासारखा रुद्रजप दिसतो, त्यामुळे भूमीवर (पृथ्वीवर) जाण्याची शक्ती आमच्याकडे नाही.

शब्दार्थ :-

काळकूट = मृत्यु आणणारे संकट

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ५६

रुद्रजाप्यविष्यासी। शमन करावया शक्त तूं होसी।
रक्ष रक्ष गा आम्हांसी। म्हणोनि विनविती पातकें॥ ५६ ॥

गद्यरुप :- "रुद्र-जप ह्या विषाचे निवारण करण्यासाठी, तू समर्थ आहेस. अरे यमराजा, आमची रक्षा कर." असे म्हणून पातके (यमराजाला) विनवीत होती.

शब्दार्थ :-

शमन = निवारण
शक्त = समर्थ
गा = अरे, अग

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ५७

इतुकें बोलतीं पातकें। ऐकोनि यम माथा तुके।
कोपोनि निघाला तवकें। ब्रह्मलोका तये वेळीं॥५७॥

गद्यरुप :- पातके इतके हे बोलत असलेली ऐकल्यावर, यमाने मस्तकाने (पातकांचे सांगणे) योग्य आहे हे दर्शविले आणि तो रागावून त्या वेळी त्वेषाने ब्रह्मलोकाकडे निघाला.

शब्दार्थ :-

माथा = मस्तक	तुक = योग्यता
कोप = राग	तवक = त्वेष

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ५८

जाऊनियां ब्रह्मयापाशीं। विनवी यम परियेसीं।
जय जया कमळवासी। जगस्त्रष्ठ्या चतुर्मुखा॥ ५८॥

गद्यरुप :- ब्रह्मदेवापाशी जाऊन यमाने ब्रह्मदेवाला विनविले, असे ऐकिवात आहे. यम म्हणाला, "कमळात वास करणाऱ्या, चार मुख असलेल्या, जग निर्मात्या ब्रह्मदेवा, तुझा जयजयकार असो."

शब्दार्थ :-

परियसणे = ऐकणे	वास = राहणे
स्त्रष्टार / सृष्टा (संस्कृत) = उत्पादक, ब्रह्मदेव	
चतुर्मुख = चतुः (चार) + मुख (तोंड)	

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ५९

आम्ही तुझे शरणागत। आज्ञेवरी कार्य करीत।
पापी नरांतें आणित। नरकार्णव-पुरासी॥ ५९॥

गद्यरुप :- आम्ही तुझे शरणागत (शरण आलेले) असून, तुझ्या आज्ञेनुसार, पापी माणसांना नरक (रुपी) समुद्र असलेल्या नगरात आणण्याचे कार्य (काम) आम्ही करतो.

शब्दार्थ :-

नर = मनुष्य (माणुस)	कार्य = काम
नरकार्णव = नरक + अर्णव (समुद्र)	पुर = नगर

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ६०

महापातकी नरांसी। आणवूं पाठवितों भृत्यांसी।
पातकी होती पुण्यराशि। रुद्रजाप्येंकरूनियां॥ ६० ॥

गद्यरुप :- महापातकी मनुष्यांना (माणसांना) आणण्यासाठी (मी माझे) सेवक (यमदूत) पाठवितो. रुद्रजप करुन पातकी (पापी लोक) पुण्यराशि (पुण्यवान) होत आहेत.

शब्दार्थ :-

नर = मनुष्य	पातक = पाप	भृत्य = सेवक

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ६१

समस्त जाती स्वर्गासी। महापातकी अतिदोषी।
नाश केला पातकांसी। शून्य जहाले नरकार्णव॥ ६१ ॥

गद्यरुप :- महापापी लोक अतिशय दोषी असलेले सगळे जण (मृत्युनंतर) स्वर्गाला जात आहेत. (वास्तविक हे महापापी लोक नरकांत जावयास हवेत), परंतु रुद्र-जपाने पातकांचा (पापांचा) नाश केल्याने, नरक-समुद्र शून्य (रिकामा) झालेला आहे.

शब्दार्थ :-

समस्त = सर्व
पातक = पाप
नरकार्णव = नरक + अर्णव (समुद्र)

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ६२

नरक शून्य झाले सकळ। माझें राज्य निर्फळ।
समस्त जहाले कैवल्य। उत्पत्ति राहिली स्वामिया॥ ६२॥

गद्यरुप :- "सगळे नरक शून्य रिकामे झाल्याने, माझे राज्य निर्फळ झालेले आहे. सगळ्यांना (मृत्युनंतर) मुक्ति मिळत असल्याने; हे स्वामी, सृष्टीची (जीवन-मृत्यु चक्रातून होणारी) उत्पत्ति थांबली आहे."

शब्दार्थ :-

कैवल्य = मोक्ष, मुक्ति	सकळ = सर्व, सगळे

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ६३

तुम्हीं होऊनि मनुष्यासी। स्वामित्व दिधलें भरंवसीं।
रुद्राध्यायनिधानेंसी। केंवी कारणें दिधलेति॥ ६३ ॥

गद्यरुप :- तुम्ही स्वतः होऊन मनुष्याला रुद्राध्यायचा ठेवा देऊन, खात्रीने मुक्ति मिळविण्याचे मालकी हक्क दिलेत. हे तुम्ही कशासाठी मनुष्याला दिले आहेत ? (कशासाठी केले?)

शब्दार्थ :-

स्वामित्व = मालकी हक्क	भरंवसा = खात्री
निधान = ठेवा	केंवी = कसे ?

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ६४

यातें उपाव करावयासी। देवा तूंचि समर्थ होसी।
राखें गा आम्हांसी। राज्य गेलें स्वामिया॥ ६४॥

गद्यरुप :- "(ब्रह्म)देवा तूच यावर उपाय करण्यासाठी समर्थ आहेस. हे स्वामी, माझे (नरकात असलेले) राज्य गेले; तूच आम्हाला राख (आमचे रक्षण कर)."

शब्दार्थ :-

उपाव = उपाय

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ६५

याकारणें मनुष्यासी। पातकातें लाविलेंसी।
रुद्रजाप्य महाविष। पातकातें जाळीतसे॥ ६५॥

गद्यरुप :- "या कारणासाठी (माझ्या नरक राज्यात नरक-यातना भोगण्यासाठी), तू मनुष्याला पातक (पाप) करण्यास लावलेस. (परंतु) रुद्र जपाचे महाविष पापाला जाळत आहे."

शब्दार्थ :-

पातक = पाप

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ६६

येणेंपरी यम देखा। विनविता झाला चतुर्मुखा।
प्रत्युत्तर देतसे ऐका। ब्रह्मदेव यमासी॥ ६६ ॥

गद्यरुप :- अशा प्रकारे चार मुख असलेल्या ब्रह्मदेवाला, यम विनविताना दिसत होता. ब्रह्मदेवाने यमाला दिलेले प्रत्युत्तर* ऐका.

शब्दार्थ :-

परी = प्रकार
चतुर्मुखा = चतुः (संस्कृत) चार +मुख (तोंड)
प्रत्युत्तर = प्रति + उत्तर = जाबास जाब (म्हणणे), उलट उत्तर

यमाला ब्रह्मदेवाने प्रत्युत्तर*दिले = यम जे म्हणाला, त्यावर ब्रह्मदेव बोलला.

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ६७

अभक्तीनें दुर्मदेसीं। रुद्रजाप्य करिती तयांसी।
अज्ञान लोक तामसी। उभे निजूंनि पढती नर॥ ६७॥

गद्यरुप :- उन्मत्त झालेले लोक, जे भक्ती विरहित रुद्रजप करतील त्यांना तसेच तमोगुणी अज्ञानी लोक रुद्र जपाच्या ठिकाणी उभे राहून किंवा निजून जप पढतात (करतात).

शब्दार्थ :-

दुर्मद = उन्मत्त, उग्र, हेकट
तामसी = तमोगुणी, तापट, रागीट

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ६८

त्यांतें अधिक पापें घडती। त्यांसी तुम्ही दंडा त्वरिती।
जे जन भक्तिभावें व्यक्ती। रुद्रजाप्य नरांते॥ ६८॥

गद्यरुप :- (अशा) त्या लोकांच्या हातून अधिक पापे घडत असल्याने, त्यांना तुम्ही त्वरित (लगेच) दंड (शासन) करा. ज्या लोकांमधील रुद्रजप करण्यातील भक्तिभावात स्पष्टता असते, अशा मनुष्यांना (माणसांना)

शब्दार्थ :-

जन = लोक	व्यक्ती = स्पष्टता	नर = मनुष्य

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ६९

बाधों नका तुम्ही ऐका। सांगावें ऐसें पातका ।
रुद्रजाप्य पुण्य अधिका। जे जन म्हणती भक्तिसीं॥ ६९ ॥

गद्यरुप :- "(यमराजा) अशा लोकांना बाधू नका, तुम्ही हे ऐका. जे लोक भक्तीभावाने रुद्र जप करतात, त्यांचे पुण्य अधिक असते, असे तुम्ही पातकांना सांगावे."

शब्दार्थ :-

जन = लोक

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ७०

पूर्वजन्मीं पाप करिती। अल्पायुषी होऊनि उपजती।
तया पापा होय निष्कृति। रुद्रजाप्येंकरूनियां॥ ७० ॥

गद्यरुप :- "जे लोक पूर्वजन्मात (आधीच्या जन्मांत) पाप करतात, ते अल्पायुषी होऊन जन्माला येतात. रुद्रजप केल्याने त्यांच्या पापाचे प्रायश्चित्त होते."

शब्दार्थ :-

अल्प = लहान, थोडे
निष्कृति = प्रायचित्त फेड
उपजणे = जन्मणे

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ७१

तैसा अल्पायुषी नर। रुद्रजाप्य करितां निर्भर।
पापें जावोनि निर्धार। दीर्घायुषी होय देखा॥ ७१ ॥

गद्यरुप :- "तशा(पूर्वजन्मांत पापे केलेल्या) अल्पायुषी मनुष्याने रुद्रजप पूर्ण करताच, त्याची पापे जाऊन त्याला दीर्घ आयुष्य मिळते; हा नियम आहे, हे पहा."

शब्दार्थ :-

अल्प = लहान, थोडे	निर्भर = पूर्ण गाढ अतिशय
निर्धार = नियम	दीर्घ = लांब, मोठा

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ७२

तेजो -बल -वर्चस्व-धृति। आयुरारोग्य ज्ञान संपत्ति।
रुद्र जपतां वर्धती। ऐक यमा एकचित्तें॥ ७२ ॥

गद्यरुप :- "रुद्र जप केल्याने कर्तृत्व, महत्व, शक्ती, धैर्य, आयुष्य, आरोग्य, ज्ञान, संपत्ति वाढतात. हे यमा, तू एकचित्ताने ऐक."

शब्दार्थ :-

तेज = कांती, कर्तृत्व	वर्चस्व = महत्व, श्रेष्टपणा, प्रामुख्य
बल = शक्ती, बळ	धृति = धैर्य, धृढता
आयुरारोग्य = आयुः (संस्कृत)= आयुष्य + आरोग्य	
वर्धणे = वाढणे	

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ७३

रुद्रजाप्यमंत्रेसी। स्नान करविती ईश्वरासी।
तेंचि उदक भक्तिसीं। जे जन करिती स्नानपान॥ ७३ ॥

गद्यरुप :- रुद्र जप करताना, मंत्र म्हणत, ईश्वराला (शंकराला) स्नान करवून (घालून); त्याच स्नानाच्या उदकाने जे लोक स्नानात वापरलेले उदक भक्तीभावाने (स्वतः) पितात;

शब्दार्थ :-

पान = पिणे	उदक = पाणी

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ७४

त्यातें मृत्युभय नाही। आणिक एक नवल पाहीं।
रुद्रजाप्यें पुण्य देहीं। स्थिरंजीव फळ असे॥ ७४॥

गद्यरुप :- त्यांना (उदकाने स्नानपान करणाऱ्या भक्तांना) मृत्युचे भय नसते. आणखीन एक नवल दिसते; ‘रुद्र जपाने पुण्यवान देह मिळून, शांत जीवनाचे जगण्याचे फळ असते (मिळते).’

शब्दार्थ :-

स्थिरं (संस्कृत)= शांत

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ७५

रुद्र जपोनि उदकासी। स्नान केलिया नरांसी।
मृत्यु भितसे तयांसी । तेही तरतील भवार्णवीं॥ ७५॥

गद्यरुप :- रुद्र जप करुन, त्या उदकाने स्नान केलेल्या मनुष्यांना (माणसांना) मृत्यु भीतो (घाबरतो); हेही (लोक) संसार सागर तरुन जातात.

शब्दार्थ :-

नर = मनुष्य	उदक = पाणी
भवार्णव = भव (संसार) + अर्णव (सागर)	

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ७६

शतरुद्र अभिषेकासी। पूजा करिती महेशासी।
ते जन होती शतायुषी। पापनिर्मुक्त परियेसा॥ ७६ ॥

गद्यरुप :- शंभर रुद्र जप-अभिषेकाने शंकराची पूजा जे लोक करतात, ते शतायुषी होतात; तसेच हे लोक पाप बंधन रहित होतात, हे ऐका.

शब्दार्थ :-

महेश = शंकर	शत = शंभर	जन = लोक
शतायुष = शत (शंभर) + आयुष्य		
निर्मुक्त (संस्कृत) = बंधनरहित		

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ७७

ऐसें जाणोनि मानसीं। सांगावें आपुले दुतांसी।
रुद्रजाप्यद्विजासी। बाधों नको म्हणे ब्रह्मा॥७७॥

गद्यरुप :- "(यमराजा रुद्रजपाविषयी हे) सर्व तु मनःपुर्वक जाणून घेऊन, आपल्या दुतांना सांग. रुद्र जप करणाऱ्या ब्राह्मणांना तू बाधू नकोस," असे ब्रह्मदेव म्हणाला.

शब्दार्थ :-

मानसी = मन	द्विज = ब्राह्मण	बाधणे = दुःख देणे

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ७८

ऐकोनि ब्रह्मवचना। यम आला आपुले स्थाना।
म्हणोनि पराशरें जाणा। रायापुढें निरोपिलें॥७८॥

गद्यरुप :- “असे ब्रह्मदेवाचे बोलणे ऐकून, यमराज आपल्या स्थानी (परत) गेला.”असे म्हणून पराशर ऋषींनी राजापुढे (राजाला) दिलेला संदेश जाणा (जाणून घ्या).

शब्दार्थ :-

वचन = बोलणे	निरोप = संदेश	राया = राजा

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ७९

आतां तुझे कुमारासी। उपाय सांगेन परियेसीं।
दहासहस्र रुद्रेसीं ।स्नपन करीं शिवासी॥७९॥

गद्यरुप :- "आता तुझ्या कुमाराचा (कुमारासाठी करण्याचा) उपाय सांगेन, तो ऐक. दहाहजार रुद्र जपाने, शिवावर (शंकरावर) अभिषेक कर."

शब्दार्थ :-

परियसणे = ऐकणे	सहस्र (संस्कृत) = हजार
स्नपनं (संस्कृत) = स्नान घालणे, शिंपडणे	

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ८०

दहा सहस्र वर्षांवरी। तुझे पुत्र वांचती स्थिरी।
राज्य करितील धुरंधरी। जैसा इंद्र अमरनाथ॥८०॥

गद्यरुप :- “दहा हजार वर्षांवर (वर्षांहून जास्त वर्षे) तुझे पुत्र खात्रीने जगतील. जसा इंद्र अमरनाथ आहे, तसेच तुझे पुत्र कुशल राज्य करतील.”

शब्दार्थ :-

सहस्र = हजार	पुत्र = मुलगा
वाचणे = जगणे, बचावणे	स्थिर (संस्कृत) = खात्रीचे
धुरंधर = कुशल	

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ८१

त्याचे राज्यश्रियेसी। नाश नव्हे परियेसीं।

अकंटक संतोषी। राज्य करिती तुझे सुत॥८१॥

गद्यरुप :- त्यांच्या राज्यलक्ष्मीचा (संपत्तिचा) नाश होणार नाही, हे ऐक. तुझा मुलगा (कोणताही) व्यत्यय न येता, समाधानाने राज्य करेल.

शब्दार्थ :-

श्रिया = लक्ष्मी	परियसणे = ऐकणे	सुत = मुलगा
कंटक = काटा = व्यत्यय		संतोष = समाधान

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ८२

बोलवावें द्विजांसी। विद्वज्जन - शतांसी ।
ज्ञानी यज्ञनिष्ठांसी। पाचारावें परियेसा॥ ८२ ॥

गद्यरुप :- "विद्वान ब्राह्मणांना तसेच यज्ञ निष्ठेने करणाऱ्या अशा शंभर ज्ञानी लोकांना बोलवावे," हे ऐका.

शब्दार्थ :-

द्विज = ब्राह्मण	विद्वान = लोक	
विद्वज्जन = विद्वत् (विद्वान) + जन (लोक)		
शत = शंभर	पाचारणे = बोलावणे	परियसणे = ऐकणे

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ८३

ऐशा विप्रांकरवीं देखा। करावें शिवासी अभिषेका।
आयुष्य वर्धेल कुमारका। सद्यःश्रेय होईल॥८३॥

गद्यरुप :- “अशा (ज्ञानी) ब्राह्मणांकरवी शंकराला अभिषेक करुन पहा. तुझ्या कुमाराचे (मुलाचे) आयुष्य वाढेल, हेच सध्या कल्याणकारक होईल.”

शब्दार्थ :-

विप्र = ब्राह्मण	शिव = शंकर	वर्धणे = वाढणे
सद्यः = सध्या, वर्तमानकाळी	श्रेय = कल्याण	

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ८४

येणेंपरी रायासी। सांगे पराशर ऋषि।

राजा आनंदभरितेसीं। आरंभ केला तिये वेळीं॥८४॥

गद्यरुप :- अशाप्रकारे राजाला पराशर ऋषींनी सांगितले. त्यावेळी राजाला आनंदाची भरती आली, त्याने (राजाने) आरंभ केला.

शब्दार्थ :-

परी = प्रकार	राया = राजा
भरिते = भरती	पूर्णता = वृद्धी

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ८५

जैसा पराशर गुरु। निरोप दिधला द्विजवरु।
तैसे बोलाविले सहस्त्रु। विद्वज्जन ब्राह्मणांसी॥ ८५॥

गद्यरुप :- जसे पराशर गुरुंनी सांगितले, (राजाने) ब्राह्मणश्रेष्ठांना तसा संदेश दिला. (राजाने) हजारो विद्वान ब्राह्मणांना बोलावले.

शब्दार्थ :-

निरोप = संदेश	द्विज = ब्राह्मण
वर = श्रेष्ठ	सहस्त्र = हजार

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ८६

शतसंख्या कलशेसीं। पुण्य इक्षुरसेसीं।
विधीपूर्वक शिवासी। अभिषेचिलें परियेसा॥ ८६ ॥

गद्यरुप :- शंभर कलशांनी (अभिषेक पात्रांनी) विधीपूर्वक शिवाला (शंकराला) ऊसाच्या रसाने अभिषेक करण्याचे पुण्य(कर्म) (राजाने) केले, हे ऐका.

शब्दार्थ :-

शत (संस्कृत) = शंभर	कलश = पात्र
इक्षु = ऊस	परियसणे = ऐकणे

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ८७

त्याचि जळें पुत्रासी। स्नान करवी प्रतिदिवसीं।
येणेंपरी सात दिनेसीं। आराधिला ईश्वर॥८७॥

गद्यरुप :- (अभिषेकाच्या) त्याच पाण्याने (राजाने आपल्या) मुलाला दररोज स्नान घातले. अशाप्रकारे सात दिवस ईश्वराची शंकराची (राजाने) पूजा केली.

शब्दार्थ :-

जळ = जल = पाणी	पुत्र = मुलगा
प्रतिदिवस = दररोज	आराधणे = पूजा करणे

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ८८

अवधि जहाली दिवस सात। मूर्च्छना आली अकस्मात।
क्षण एक पडला अचेत। पराशरें रक्षिलें॥८८॥

गद्यरुप :- सात दिवसांची (पराशरऋषींनी सांगितलेली राजपुत्राची आयुष्य मर्यादा*) झाली (संपली). आकस्मित राजपुत्राला चक्कर आली. एका क्षणात राजपुत्र अचेतन होऊन (खाली) पडला. पराशर ऋषींनी त्याचे राजपुत्राचे रक्षण केले.

शब्दार्थ :-

अवधि = वेळ मर्यादा
मूर्च्छना = मूर्च्छा = चक्कर, घेरी
अचेत = चेतना रहित = अचेतन

*संदर्भ : ओवी क्रमांक १२, अध्याय ३४

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ८९

तया समयीं अवचिता। वाक्य जहालें अदृश्यता।
सर्वेंचि दिसे अद्भुत। दंडहस्त महापुरुष॥ ८९॥

गद्यरुप :- त्यावेळी अकस्मात वाक्य अदृश्य झाले (सगळ्यांचे विचार थांबले). लगेच एक हातात दंड घेतलेला महापुरुष (तिथे) दिसला. ह्या महापुरुषाला पाहून सगळ्यांची विचारशक्ती थांबली.

शब्दार्थ :-

समय = वेळ	अवचित = अकस्मात
वाक्य = विचार पूर्णपणे व्यक्त करणारा शब्दसमुच्चय	
सवे = बरोबर तत्काळ लगेच	हस्त = हात

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ९०

महादंष्ट्र भयचकित। आले होते महादूत।
समस्त द्विज रुद्र पढत । मंत्रावसारें देताति॥९०॥

गद्यरुप :- मोठ्या दाढा असलेले, भयचकित करणारे, महादूत आले होते. सर्व ब्राह्मण रुद्र पढत (जप करीत), त्या प्रसंगी (मूर्छित राजकुमाराला) मंत्र देत होते (मूर्छित राजकुमारासाठी) मंत्र म्हणत होते.

शब्दार्थ :-

<table>
<tr><td colspan="3">दंष्ट्राल (संस्कृत) = मोठ्या दाढा असलेला
दंष्ट्राकरालानि = दाढांमुळे विक्राळ
दंष्ट्राल = हत्ती किंवा जंगली डुक्करासारखे मोठे टोकदार दात असलेला प्राणि.</td></tr>
<tr><td colspan="2">भयचकित = भितीने चकित</td><td>समस्त = सर्व</td></tr>
<tr><td>द्विज = ब्राह्मण</td><td colspan="2">मंत्रावसार = मंत्र + अवसार (अवसर =प्रसंग)</td></tr>
</table>

ओवी क्रमांक ९१

मंत्राक्षता अवसरीं। घालिती तया कुमरावरी।
दूत पाहती उभे दूरी। जवळी येऊं न शकती॥९१॥

गद्यरुप :- (त्या ब्राह्मणांनी) मंत्ररुपी अक्षता त्या कुमरावर (राजपुत्रावर) घातल्या (टाकल्या). दूत दूर उभे राहून, (हे दृश्य पाहत होते) ते दूत जवळ येऊ शकत नव्हते.

शब्दार्थ :-

अवसर = प्रसंग
मंत्राक्षत = मंत्र + अक्षत (देवपूजेस लागणारे तांदूळ)

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ९२

होते महापाश हातीं। कुमरावरी टाकूं येती।
दंडहस्त शिवदूती। मारूं आले तयेवेळीं॥९२॥

गद्यरुप :- त्या दूतांच्या हातात महापाश होते. (हे महापाश) मुलावर (राजपुत्रावर) टाकण्यासाठी ते दूत आलेले होते. त्यावेळी हातात दंड असलेले शिवदूत, त्यांना (महादूतांना) मारण्यासाठी आले.

शब्दार्थ :-

कुमर = मुलगा
हस्त = हात

दंडहस्त शिवदूत : ओवीक्रमांक ८९ मधील दंडहस्त महापुरुष

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ९३

भयचकित महादूत। पळोनि गेले त्वरित।
पाठीं लागले शिवदूत। वेदपुरुषरूप देखा॥ ९३ ॥

गद्यरूप :- भितीने चकित झालेले महादूत (यमदूत) त्वरित पळून गेले. त्यांच्या पाठीमागे शिवदूत लागले. (दंडहस्त महापुरुष) शिवदूत वेदपुरुषरुपी दिसला.

शब्दार्थ :-

भय = भिती

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ९४

येणेंपरी द्विजवरें। रक्षिलें तया राजकुमरा।

आशीर्वचन देती थोर। वेदश्रुतीकरूनियां॥ ९४॥

गद्यरुप :- अशाप्रकारे ब्राह्मण श्रेष्ठांनी त्या राजकुमाराचे रक्षण केले. त्या ब्राह्मणांनी थोर आशीर्वाद वेदश्रृती नुसार दिले.

शब्दार्थ :-

परी = प्रकार	द्विज = ब्राह्मण	वर = श्रेष्ठ

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ९५

इतुकियावरी राजकुमर। सावध जाहला मन स्थिर।
राजयातें आनंद थोर। समारंभ करितसे॥९५॥

गद्यरुप :- इतक्यात राजपुत्र सावध झाला. राजा मनाने स्थिर (शांत) होऊन, त्याला थोर (मोठा) आनंद झाला. राजाने समारंभ केला.

शब्दार्थ :-

कुमर = मुलगा = पुत्र

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ९६

पूजन केलें द्विजवरांसी। भोजन जाहलें समस्तांसी।
तांबूलादि दक्षणेसीं*। संतुष्टविलें महाराजें॥ ९६ ॥

गद्यरुप :- (राजाने) ब्राह्मणश्रेष्ठांचे पूजन केले. सगळ्यांचे भोजन (जेवण) झाले. महाराजाने विडा, दक्षिणा इत्यादि देऊन (सगळ्यांना) समाधानी केले.

शब्दार्थ :-

द्विज = ब्राह्मण	वर = श्रेष्ठ	समस्त = सर्व
तांबूलादि = तांबूल (विडा) + आदि (इत्यादी)		संतुष्ट = समाधान

दक्षणेसीं *हा शब्द **दक्षिणेसीं** असा असावा.

दक्षिणा = ब्राह्मणास दिलेले द्रव्य

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ९७

संतोषोनि महाराजा। सभा रचिली महावोजा।
बैसवोनि समस्त द्विजां। महाऋषीतें सिंहासनीं॥९७॥

गद्यरुप :- महाराजाने समाधानाने मोठी सभा चांगल्या रितीने रचली (आयोजित केली). सर्व ब्राह्मणांना बसवून, (राजाने) महाऋषीला (पराशर ऋषीला) सिंहासनावर बसविले.

शब्दार्थ :-

संतोष = समाधान	वोजा = चांगल्या रितीने
द्विज = ब्राह्मण	समस्त = सर्व

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ९८

राजा आपुले स्त्रियेसहित। भोजन केले इष्ट सुत।
येवोनि बैसला सभेंत। महानंद प्रवर्तला॥९८॥

गद्यरुप :- राजाने आपली पत्नी, इष्ट लोक तसेच मुलांसह भोजन केले. राजा सभेत येऊन बसला. सभेत महा आनंद आरंभला (सभा आनंदित झाली).

शब्दार्थ :-

स्त्री = भार्या, बायको
इष्ट = इच्छित, हितावह
सुत = मुलगा

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ९९

तया समयीं ब्रह्मसुत। नारदमुनि आला त्वरित।
राजा जाऊनि सन्मुखत। अभिवंदिलें तये वेळीं॥९९॥

गद्यरुप :- त्या प्रसंगी ब्रह्मदेवाचा मुलगा नारदमुनी लगेच आला.
त्यावेळी राजाने समोर जाऊन, नारदमुनिंना नमन केले.

शब्दार्थ :-

समय = प्रसंग	सुत = मुलगा
सन्मुख = समोर	अभिवादन = नमन

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक १००

पूजा करी उपचारीं। राजा साष्टांगीं नमस्कारी।
विनवीतसे अवसरीं। कर जोडोनि परियेसा॥ १०० ॥

गद्यरुप :- राजाने (षोडश) उपचारे पूजा केली. (राजा) साष्टांग नमस्कार करुन, त्या प्रसंगी हात जोडून विनंति करीत होता, हे ऐका.

शब्दार्थ :-

उपचार = शिष्टाचार		
साष्टांग नमस्कार = शरीराची आठ अंगे (दोन हात, दोन गुडघे दोन पाय, छाती आणि डोके) जमिनीला टेकून केलेला नमस्कार		
अवसर = प्रसंग	कर = हात	परियसणे = ऐकणे

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक १०१

राजा म्हणे ऋषीसी। तूं त्रैलोक्यीं हिंडसी।
काय वार्ता विशेषीं। अपूर्व कांहीं निरोपिजे॥ १०१ ॥

गद्यरुप :- राजा (नारद)ऋषीला म्हणाला, “तू तीनही लोकांत (स्वर्ग, पृथ्वी, पाताळ) हिंडत असतो. नवीन विशेष अशा वार्तेचा (बातमीचा) संदेश द्यावा.”

शब्दार्थ :-

त्रैलोक्य = तीन लोक = स्वर्ग, पृथ्वी, पाताळ	
अपूर्व = विलक्षण नवीन	निरोप = संदेश

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक १०२

नारद म्हणे रायासी। गेलों होतों कैलासासी।
येतां देखिलें मार्गासी। अपूर्व जाहलें परियेसा॥ १०२॥

गद्यरुप :- नारद (ऋषी) राजाला म्हणाले, “मी कैलासाला गेलो होतो. परत येताना मार्गात (परतीच्या वाटेत) विलक्षण झालेले पाहिले, हे ऐका.”

शब्दार्थ :-

राया = राजा	अपूर्व = विलक्षण	परियसणे = ऐकणे

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक १०३

महामृत्यु दूतांसहित। न्यावया आला तुझा सुत।
सर्वेचि येऊनि शिवदूत। तया मृत्यूसी पराभविलें॥ १०३ ॥

गद्यरुप :- महान मृत्यु, दूतांबरोबर तुझ्या मुलाला नेण्यास आला असताना, तत्काळ शिवदुताने येऊन त्या मृत्युचा पराभव केला.

शब्दार्थ :-

महा = महान	पुत्र = मुलगा	सवे = तत्काळ

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक १०४

यमदूत पळोनि जाती। तया यमापुढें सांगती।
आमुतें मारिलें शिवदूतीं। कैसें जावें क्षितीसी॥ १०४॥

गद्यरुप :- यमदूत पळून गेले. त्या यमापुढे (जाऊन यमदूतांनी) सांगितले, “आम्हाला शिवदुताने मारले. आम्ही पृथ्वीवर कसे जावे ?”

शब्दार्थ :-

क्षिती = पृथ्वी

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक १०५

यम कोपें निघाला। वीरभद्रापाशीं गेला।
म्हणे दूतां कां मार दिधला। निरपराधें स्वामिया ॥१०५॥

गद्यरुप :- यम रागावून निघाला. तो वीरभद्रापाशी गेला. (तो (यम) वीरभद्राला) म्हणाला, "स्वामी, माझे दूत निरपराध असताना, तुम्ही माझ्या दूतांना मार का दिला ?'

शब्दार्थ :-

कोप = राग
वीरभद्र = एक शिवगण
दिधणे = देणे

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक १०६

निजकर्मानुबंधेसीं। राजपुत्र गतायुषी।
त्यातें आणितां दूतांसी। कां मारिलें शिवदूतीं॥ १०६ ॥

गद्यरुप :- स्वतःच्या कर्म बंधनाने बांधलेल्या राजपुत्राचे आयुष्य गेले आहे (संपलेले आहे). माझे दूत (राजपुत्राला) आणत असताना, शिवदूतांनी त्यांना का मारले ?

शब्दार्थ :-

निजकर्मानुबंध = निज (आपले, स्वतःचे) + कर्म (काम) + अनुबंध (बंधन, परस्पर संबंध)
गतायुष = गत (गेलेला) + आयुष (आयुष्य)

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक १०७

तयेवेळीं वीरभद्र। कोपोनि झाला महारौद्र।
वर्षावधि दहा सहस्त्र। आयुष्य असे राजकुमारा॥ १०७॥

गद्यरुप :- त्यावेळी वीरभद्र रागावून खूप रागावला (आणि म्हणाला),"राजकुमाराला असलेल्या आयुष्याची मर्यादा दहा हजार वर्ष आहे."

शब्दार्थ :-

वीरभद्र = एक शिवगण	कोप = राग
रौद्र (संस्कृत) = क्रोध, राग	सहस्त्र = हजार
वर्षावधि = वर्ष + अवधि (वेळ, मर्यादा)	

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक १०८

न विचारितां चित्रगुप्ता। वायां पाठविलें त्वां दूतां।
वोखटें केलें शिवदूतें। जीवें सोडिले तुझे दूत॥ १०८॥

गद्यरुप :- चित्रगुप्ताला न विचारता, तुझ्या दूतांना तू व्यर्थ पाठविलेस. (तुझ्या दूतांनी) शिवदूतांना (नाहक) वाईटपणा दिला (वाईट ठरविले). (त्यांनी – शिवदूतांनी) तुझ्या दूतांना, जीवानिशी सोडले.

शब्दार्थ :-

चित्रगुप्त = प्राणिमात्राच्या पापपुण्याचा हिशेब ठेवणारा यमाचा लेखक	
वाया = व्यर्थ	वोखट = वाईट

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक १०९

बोलावूनि चित्रगुप्ता। विचारावें आयुष्य क्षिप्ता।
म्हणोनि पाठविलें दूतां। चित्रगुप्ता पाचारिलें॥ १०९॥

गद्यरुप :- चित्रगुप्ताला बोलावून राजपुत्राच्या आयुष्याचे कोडे विचारावे; म्हणून (यमाने) दूतांना पाठवून चित्रगुप्ताला बोलाविले.

शब्दार्थ :-

क्षिप्ति (संस्कृत) = फेकणे, कोडे सोडविणे
पाचारणे = बोलावणे

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ११०

पुसतां चित्रगुप्तासी। काढोनि पाहती पत्रासी।
द्वादशाब्द वर्षायुषी। राजकुमरा लिहिलें असे॥ ११०॥

गद्यरुप :- चित्रगुप्ताला विचारताच, त्याने (राजपुत्राचे) पान काढून पाहिले. त्या पानावर राजकुमाराला बारा वर्षे आयुष्य आहे, असे लिहिलेले होते.

शब्दार्थ :-

पुसणे = विचारणे	पत्र = पान	द्वादशाब्द = बारा

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक १११

तेथेंचि लिहिलें होतें आणिक। दहा सहस्र वर्षें लेख।
पाहूनि यम धरी शंका । म्हणे स्वामी अपराध॥ १११ ॥

गद्यरुप :- तेथेच (राजपुत्राच्या पानावर) आणखीन दहा हजार वर्षे असे लिहिलेले होते. हा लेख पाहून (ही नोंद पाहून) यमाच्या मनात शंका धरली (आली). तो (यम) वीरभद्रास म्हणाला, “स्वामी (माझ्या हातून राजपुत्रास नेण्यासाठी, दूत पाठविण्याचा) अपराध झाला.”

शब्दार्थ :-

लेख = लिहिलेला कागद	सहस्र = हजार

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ११२

वीरभद्रातें वंदूनि। यम गेला परतोनि।
आम्ही आलों तेथोनि। म्हणोनि सांगे नारद॥ ११२॥

गद्यरुप :- "वीरभद्राला वंदन (नमन) करुन यम परत गेला. आम्ही तेथूनच आलेलो आहोत;" असे म्हणून नारद (ऋषी) सांगत होते.

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ११३

रुद्रजाप्यें पुण्य करितां । आयुष्य जाहलें तुझ्या सुता।
मृत्युतें जिंकिलें सत्य ।पराशरगुरू करितां॥ ११३ ॥

गद्यरुप :- रुद्र जपाचे पुण्य केल्याने, तुझ्या मुलाचे आयुष्य (दहा हजार वर्षे) झाले. पराशरगुरुंच्यामुळे (राजपुत्राच्या बाबतीत) मृत्युलाही जिंकता आले, हे सत्य आहे.

शब्दार्थ :-

सुत = मुलगा

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ११४

ऐसें नारद सांगोनि। निघोन गेला तेथोनि।
पराशर महामुनीं। निरोप घेतला रायाचा॥ ११४॥

गद्यरुप :- असे सांगून नारद (ऋषी) तेथून निघून गेला. पराशर महामुनीने राजाचा निरोप घेतला.

शब्दार्थ :-

राया = राजा

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ११५

समस्त गेले द्विजवर। राजा हर्षें निर्भर।
राज्य केलें धुरंधर। पुत्रपौत्रीं महीवरी॥ ११५॥

गद्यरुप :-

सगळे ब्राह्मणश्रेष्ठ (आपआपल्या घरी) गेले. राजाने अतिशय आनंदाने, पूर्ण कुशलतेने मुल-नातवंडांसह पृथ्वीवर राज्य केले.

शब्दार्थ :-

द्विज = ब्राह्मण	वर = श्रेष्ठ	समस्त = सगळे
हर्ष = अतिशय आनंद्	निर्भर = पूर्ण गाढ	धुरंधर = कुशल
पुत्र = मुलगा	पौत्र = नातू्	मही = पृथ्वी

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ११६

ऐसा रुद्राध्यायमहिमा। पूजा करावी गुरुब्रह्मा।
भेणे नलगे काळ यमा। श्रीगुरु म्हणती दंपतीसी॥ ११६॥

गद्यरुप :-

“असा रुद्राध्यायाचा महिमा असून, गुरु असलेल्या ब्रह्माची (ब्रह्मदेवाची) पूजा करावी, त्यामुळे काळ (मृत्युदेवता) यमाची भिती रहात नाही”, असे श्रीगुरु (त्या) जोडप्यास म्हणाले.

शब्दार्थ :-

महिमा = थोरवी	भेणे = भिणे	दंपती = नवरा-बायको

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ११७

सिद्ध म्हणे नामधारकासी। ऐसी कथा विस्तारेसीं।
श्रीगुरु सांगती दंपतीसी। प्रेमभावें करोनियां॥ ११७॥

गद्यरुप :- सिद्ध(मुनी) नामधारकाला म्हणाले, “अशी कथा श्रीगुरुंनी (त्या) जोडप्याला प्रेमाने सांगितली.”

शब्दार्थ :-

दंपती = नवरा-बायको

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ११८

याकारणें श्रीगुरूसी। प्रीती बहु रुद्रेसीं।
पूजा करी भक्तीसीं। रुद्राध्यायेंकरोनियां॥ ११८॥

गद्यरुप :- या कारणासाठी श्रीगुरुंना रुद्राविषयी खूप प्रेम असल्याने रुद्राध्याय करुन, रुद्राची (शंकराची) भक्तीने पूजा करावी.

शब्दार्थ :-

प्रीती = प्रेम	बहु = खूप

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवी क्रमांक ११९

म्हणोनि सरस्वती-गंगाधर। सांगे गुरुचरित्रविस्तार।
ऐकता तरती भवसागर। लाधे चारी पुरुषार्थ॥ ११९॥

गद्यरुप :- म्हणून सरस्वती- गंगाधर गुरुचरित्र विस्तार सांगत आहे. हे गुरुचरित्र ऐकतात त्या लोकांना, चारही पुरुषार्थ (धर्म, अर्थ, काम, मोक्ष) मिळतात तसेच गुरुचरित्र ऐकल्याने ते लोक संसार सागर तरुन जातात.

शब्दार्थ :-

भव = संसार	लाधणे = मिळणे

अध्याय ३४ रुद्राध्यायमहिमावर्णन

ओवीसंख्या ११९

इति श्रीगुरुचरित्रामृते परमकथाकल्पतरौ
श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्ध-नामधारकसंवादे
'रुद्राध्यायमहिमावर्णनं ' नाम चतुस्त्रिंशत्तमोऽध्यायः॥३४॥
॥श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु॥

गद्यरुप :- अशाप्रकारे श्रीगुरुचरित्र अमृतातून, कल्पतरुप्रमाणे परमकथा असणाऱ्या, श्रीनृसिंहसरस्वती यांच्या उपआख्यानातून, सिद्ध(मुनी) व नामधारक यांच्या संवादातून, 'रुद्राध्यायमहिमावर्णन' नावाचा चौतिसावा अध्याय श्रीगुरुदेवदत्तात्रेयाला अर्पण असो.

शब्दार्थ :-

चतुस्त्रिंशत् = ३४

॥श्रीगुरुदेव दत्त॥